महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे   Rs.2/-   कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ❖ ०९ एप्रिल २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २८१ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## मंत्रिमंडळ निर्णय संक्षिप्त

1) नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व पुणे या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतील शासकीय जमिनी संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणार, यातून विकास कामांना वेग येणार
(नगर विकास)

2) राज्याचे वाळू- रेती निर्गती धोरण-2025 जाहीर
(महसूल)

3) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा निर्मुलन व पुनर्वसन) अधिनियम-१९७१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय; झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळणार
(गृहनिर्माण)

4) वांद्रे रिक्लेमेशन व आदर्श नगर (वरळी) या दोन म्हाडा अभिन्यासातील इमारतींचा C&DA मार्फत एकत्रित पुनर्विकास करण्याचा निर्णय
(गृहनिर्माण)

5) सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करण्यासाठी धोरण विशेष अभय योजना-2025
(महसूल)

6) नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना करण्यात येणार
(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)

7) खाजगी अनुदानित आयुर्वेद व खाजगी अनुदानित युनानी संस्थांमधील गट-ब, क व ड संवर्गातील शासन मंजूर पदावरील शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना पूर्वलक्षी प्रभावाने एक व दोन लाभांची 'सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना' लागू करण्याचा निर्णय
(वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये)

8) शासकीय आयुर्वेद / होमिओपॅथी / युनानी / योग व निसर्गोपचार महाविद्यालयांतील कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर भरावयाच्या अध्यापकांचे दरमहा एकत्रित ठोक मानधन निश्चित
(वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये)

9) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा
(ग्रामविकास)

## बदलापूर पाण्याबाबत स्वयंपूर्ण शहर होणार : आ.किसन कथोरे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर: बदलापुरात वाढीव पाणी पुरवठा योजनेचे जलकुंभ उभारण्यात येणार आहेत. एमआयडीसीच्या बारवी धरणातूनही पाणी उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर काही छोटी धरणेही उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे आगामी काळात बदलापूर पाण्याबाबत स्वयंपूर्ण शहर होणार असल्याचा दावा आमदार किसन कथोरे यांनी केला.



बदलापुर पूर्वेकडील कात्रप भागात उभारण्यात आलेल्या जलकुंभाचे रामनवमीचे औचित्य साधून आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना त्यांनी बदलापूर पाण्याबाबत स्वयंपूर्ण शहर होणार असल्याचा दावा केला. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे, जिल्हा महामंत्री संभाजी शिंदे, बदलापूर शहराध्यक्ष शरद तेली, माजी नगरसेवक किरण भोईर, स्वामी डार्विन, नरहरी पाटील स्थानिक माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मारुती पाटील, आदित्य पाटील, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिक्षक अभियंता कांबळे, अंबरनाथ विभाग कार्यकारी अभियंता मिलिंद देशपांडे आदी उपस्थित होते. कात्रप भागात उभारण्यात आलेल्या या जलकुंभामुळे २० लाख लिटर पाणी उपलब्ध होणार असल्याने गेल्या अनेक वर्षांपासून असलेली पाणी समस्या दूर होण्यास मदत होणार असल्याचे आमदार किसन कथोरे यांनी आपल्या भाषणात सांगितले.जलकुंभ उभारण्यासाठी जागेपासून अनेक अडचणी होत्या. परंतु त्यावर मात करीत राम नवमीच्या मुहूर्तावर या जल कुंभाचे लोकार्पण झाले असल्याचे कथोरे म्हणाले. येत्या १५ मे पर्यंत कात्रप भागातील किर्ती पोलिस परिसरातील जलकुंभाचे काम पूर्ण होणार असून आणखी १० जलकुंभ प्रस्तावित असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### एमएमआरडीए मार्फत बांधणार छोटी धरणे

**एमआयडीसी कडून बारवी धरणाचे ५० एमएलडी पाणी बदलापूरला घेणारच आहोत. त्याचबरोबर एमएमआरडीए मार्फत चिंचवली व नंबरवाडी ही दोन छोटी धरणेही उभारली जाणार आहेत. त्यातून सुमारे २२ एमएलडी पाणी बदलापूरला मिळणार आहे. त्याशिवाय भोज धरणातून १४ ते १५ एमएलडी पाणी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या धरणांची उभारणी झाल्यानंतर बदलापूरला पुढील ३० ते ४० वर्ष पाणी समस्या भेडसावणार नाही, असा विश्वास आमदार किसन कथोरे यांनी व्यक्त केला.**

## पहिल्या नऊ महिन्यांत ६० टक्के निधी खर्च करा

### मंत्रालयातील वित्त विभागाच्या सर्व विभागांना सूचना



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबई अर्थसंकल्पात तरतूद केलेला निधी वर्षभर खर्च करायचा नाही आणि आर्थिक वर्ष संपत आले की निधी खर्च करण्यासाठी धावपळ करायची हे चित्र बदलण्यासाठी वित्त विभागाने सर्व विभागांना नियोजित पद्धतीने खर्च करण्याच्या सूचना दिल्या आहेत. वित्त विभागाने याबाबत जारी केलेल्या परिपत्रकात पहिल्या नऊ महिन्यांत (डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत) सर्व विभागांनी अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या निधी पैकी ६० टक्के निधी खर्च करण्याबाबतची सूचना सर्व विभागांना केली आहे. वित्त विभागाने काढलेल्या परिपत्रकानुसार २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय वार्षिक तरतुदींपैकी पहिल्या नऊ महिन्यांत ६० टक्के निधी खर्च करण्याची सूचना केली आहे. त्यामुळे आता डिसेंबर २०२५ पर्यंत सर्व विभागांना अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या एकूण वार्षिक तरतुदीच्या ६० टक्के निधी खर्च करावा लागणार आहे. याशिवाय आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधी, जिल्हा वार्षिक योजना याचा खर्चही डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत ६० टक्के करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. यामुळे तरतूद केलेला निधी नियोजनबद्ध पद्धतीने खर्च होऊ शकेल आणि आर्थिक वर्षाच्या शेवटच्या म्हणजेच मार्च महिन्यात निधी खर्च करण्यासाठी सर्व विभागांकडून केली जाणारी धावपळ आणि त्यामुळे वित्त विभागावर येणारा ताण कमी होऊ शकेल. या कारणांमुळे वित्त विभागाने घेतला निर्णय वेतनविषयक खर्च वगळता उर्वरित बाबींचा खर्च आर्थिक वर्षाच्या कालावधीत समप्रमाणात केला जात नाही. निधी उपलब्ध असूनही प्रक्रियेअभावी तो खर्च करता येत नाही. परिणामी बहुतांश तरतुदी वर्षभर अखर्चित राहतात व आर्थिक वर्षाच्या अखेरच्या कालावधीत पुरेशा तयारीशिवाय खर्च केला जातो. दरवर्षी मोठ्या प्रमाणावर अर्थसंकल्पीय तरतूद आर्थिक वर्षाच्या शेवटच्या खर्च होते. यात वित्तीय शिस्तीचे पालन केले जात नाही, तसेच विकासकामांची प्रगती राखली जात नाही. त्यामुळे वित्त विभागाने हा निर्णय घेतला आहे. निधी खर्च करण्यासाठी धावपळ होऊ नये यासाठी अशा सूचना दिल्या आहेत.

## भगव्याचा आदर असेल तर मुस्लिमांचे संघात स्वागत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुंबई : 'भारत माता की जय' ही घोषणा देण्यास संकोच वाटत नसेल आणि भगव्या ध्वजाचा आदर असेल तर मुस्लिमही राष्ट्रीय संघाच्या शाखेत येऊ शकतात, अशी भूमिका सरसंघचालक मोहन भागवत यांनी मांडली आहे. जे लोक स्वतःला औरंगजेबाचे वंशज मानत नाहीत त्या सर्व भारतीयांचं संघाच्या शाखेत स्वागत असल्याचं ते म्हणाले. सरसंघचालक मोहन भागवत हे 4 दिवसीय वाराणसी दौऱ्यावर आहेत. यावेळी, भागवत यांनी जातीय भेदभाव नष्ट करण्यासंदर्भात, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेसह अनेक मुद्द्यांवर आपले मत व्यक्त करत, एक बलशाली समाज निर्माण करण्यासंदर्भात भाष्य केले. त्यावर एका स्वयंसेवकाने मुस्लिम समाजाच्या संघ सहभागासंदर्भात भागवत यांना प्रश्न केला असता, त्यांनी शाखेत सर्व भारतीयांचे स्वागत आहे. मात्र यासाठी एक अट आहे, ती म्हणजे, शाखेत येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला 'भारत माता की जय' ही घोषणा देताना संकोच वाटू नये आणि त्याने भगव्या ध्वजाचा आदर करायला हवा, अशी भूमिका मांडली. भारतीयांचे धर्म वेगळे, पण संस्कृती एकच आमच्याबद्दल मदत भारतातील लोकांचे धर्म वेगवेगळे असले तरी, संस्कृती मात्र सर्वांची एकच आहे.सर्व धर्म, पंथ आणि जातीच्या लोकांचे संघाच्या शाखेत स्वागत आहे, असे भागवत म्हणाले.

## तो '१४ वर्षीय मुलगा गुजरातला सापडला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर: बदलापूरातून बेपत्ता झालेला चौदा वर्षीय मुलगा अखेर गुजरातला सापडला आहे. या मुलाचे अपहरण झाले की आणखी काही, याविषयी वेगवेगळे तर्कवितर्क व्यक्त होत होते. मात्र तो सुखरुप असून अभ्यासाच्या तणावातून आलेल्या नैराश्यातून घर सोडून मामाकडे निघून चालला होता, अशी माहिती पुढे आली आहे.

बदलापूर पश्चिमेकडील रमेशवाडी भागात राहणारा १४ वर्षीय मुलगा क्लासला जातो असे सांगुन घरातुन बाहेर पडला. तो तो घरी परतलाच नव्हता. त्यामुळे बदलापुरात एकच खळबळ उडाली होती. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर बदलापूर पश्चिम पोलिस त्याचा शोध घेत असतानाच तो गुजरातमध्ये मिळून आला. तेथील रेल्वे स्टेशनवर आरपीएफने चौकशी केली असता तो घर सोडून गुजरातमध्ये मामाकडे चालला असल्याची माहिती पुढे आली. त्यानुसार त्याचे पालक गुजरातला गेले असून मुलाला घेऊन परत येत आहेत, अशी माहिती बदलापूर पश्चिम पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल थोरवे यांनी दिली. अभ्यासाच्या ताणामुळे आलेल्या नैराश्यातून तो घर सोडून गेला होता. त्याच्या मित्रांनाही तो घर सोडून जाणार असल्याचे बोलला होता, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, पालकांच्या मुलांकडून अपेक्षा असणे गैर नाही. परंतु अनेकदा अवास्तव अपेक्षा बाळगल्यास मुलांवर अभ्यासाचा ताण येऊन ते नैराश्येत जातात. त्यातून मुले घर सोडून जाण्यासारखे प्रकार होत असतात. त्यामुळे असे प्रकार टाळण्यासाठी पालकांनी मुलांकडून अपेक्षा बाळगताना मुलांची क्षमता लक्षात घेऊन त्यांच्यावर अभ्यासाचा ताण येणार नाही, याची काळजी घ्यावी, असे आवाहनही अनिल थोरवे यांनी केले आहे.

## शहापुरातील जनसुविधेची कामे संशयाच्या भोवऱ्यात

### सत्ताधारी भाजपा पदाधिकारी- कार्यकर्त्यांचा आक्षेप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर : शहापूर तालुक्यातील जनसुविधा योजने अतंर्गत मंजूर करण्यात आलेली कामे हि हेतूपुरस्सर निकषांना फाटा देवून मंजूर करण्यात आली आहेत.यामध्ये जाणीवपूर्वक काही ग्रामपंचायतींना वगळण्यात आले असून यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार करण्यात आल्याचा आरोप भारतीय जनता युवा मोर्चा शहापूर तालुका अध्यक्ष हरीश निचिते यांनी केला असून याबाबत त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांना निवेदन देऊन तालुक्यातील कोट्यावधी रुपयांच्या १२३ कामांना स्थगिती देण्याची मागणी केली आहे. शहापूर तालुक्यातील चरिव, चिखलगाव, चेरपोली-बामणे, जांभुलवाड, टहारपूर,कळगाव, ठुणे, डोळखांब, ढाढरे, मांजरे, बोरशेती, कलमगाव, कानवे,कोथले,खातीवली, भावसे, दहागाव या ग्रामपंचायतींसह तालुक्यातील इतर ग्रामपंचायतीना १२३ विकास कामांच्या माध्यमातून ८५४. ५ लक्ष रकमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.मात्र तालुक्यातील उर्वरित ग्रामपंचायतींना एकही विकास काम मंजूर करण्यात आले नाही असे श्री. निचिते यांचा आरोप आहे.किंबहुना काही ग्रामपंचायतींचा प्रस्ताव अनेक वर्षांपासून सादर करून अत्यावश्यक मागणी करूनही त्यांना मागितलेली काम देण्यात आलेले नाहीत याबाबत त्यांनी खंत व्यक्त केली आहे.या कामांबाबत उर्वरित ग्रामपंचायत मधील नागरिक संशय व्यक्त करत असल्याचे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. तसेच तालुक्यातील अनेक गावातील अतंर्गत रस्ते, ग्रामपंचायत कार्यालय विस्तारीकरण, स्मशानभूमी सुशोभीकरण, ग्रामपंचायत कार्यालय सुशोभीकरण,तसेच अमुक माणसाचे घराकडून तमुक माणसाचे घराकडे जाणारा रस्ता त्यांना प्रथम प्राधान्य देणे, हे जनसुविधा योजनेच्या कोणत्या निकषात बसत नसल्याचे त्यांचे यांचे म्हणणे आहे.दरम्यान, काही ग्रामपंचायतींना जागेअभावी स्मशानभूमीच नाही त्या ठिकाणी योग्य नियोजन करावे, अत्यंत गरज आहे अशा ठिकाणी स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी निधी देऊन अशी जनसुविधेची कामे करणे गरजेचे असतांना प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप हरीश निचिते यांनी केला आहे.

> **जिल्हा वार्षिक योजना जनसुविधा योजना सन २०२४-२५ शहापूर तालुक्यातील अनावश्यक कामांना त्वरित स्थगिती देऊन अन्याय झालेल्या ग्रामपंचायतींना न्याय देण्यात यावा.भाजपा युवा मोर्चाचे शहापूर तालुका अध्यक्ष हरीश निचिते यांनी लेखी पत्रांद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे तसेच उपजिल्हाधिकारी संदीप माने यांना निवेदन दिले असून शासनाने या प्रकरणाची योग्य दखल न घेतल्यास भाजपा ठाणे ग्रामीण कार्यकारीणीकडून उग्र आंदोलन करण्यात येईल**
> **. अशोक इरनक, भाजपा नेते.**




## डोंबिवलीत मराठी-उत्तर भारतीयात हाणामारी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : मराठी आणि हिंदी भाषावादाचा परिणाम आता डोंबिवलीतही झाला आहे. येथे एकमेकांच्याशी ओळखपाळख नसलेल्या शेजाऱ्यांमध्ये इंग्रजीत "Excuse Me" बोलल्याने मराठी प्रेम उफाळून आल्याने दांडक्यांनी मारहाण झाल्याचा प्रकार सुशिक्षितांची नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंबिवली येथे घडली आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सुरु आहे.




मराठी आणि हिंदी भाषावादाचा परिणाम आता डोंबिवलीतही झाला आहे. येथे एकमेकांच्याशी ओळखपाळख नसलेल्या शेजाऱ्यांमध्ये इंग्रजीत "Excuse Me" बोलल्याने मराठी प्रेम उफाळून आल्याने दांडक्यांनी मारहाण झाल्याचा प्रकार सुशिक्षितांची नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंबिवली येथे घडली आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सुरु आहे.डोंबिवली पश्चिम येथील जुनी डोंबिवली परिसरात एका साध्या "एस्क्युज मी" या इंग्रजी शब्दावरून मोठा वाद निर्माण झाला. गणेश श्रद्धा बिल्डींगमध्ये राहणाऱ्या पुनम अंकीत गुप्ता या महिलेला इंग्रजीत बोलल्याने "मराठीत बोला" असे सांगून तिला आणि तिच्या कुटुंबीयांवर बेदम मारहाण झाली आहे.या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. याप्रकरणी विष्णूनगर पोलिस ठाण्यात दोन्ही महिलांच्या वेगवेगळ्या तक्रारी घेतल्या आहेत. या प्रकरणात तिघा आरोपींविरोधात अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

### 'इंग्रजीत नको, मराठीत बोला' म्हणत मारहाण

जुनी डोंबिवली येथील गणेश श्रद्धा इमारतीमध्ये राहणाऱ्या तक्रारदार त्यांच्या मैत्रिणीसोबत या सोमवारी ( 7 एप्रिल 2025 ) रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या गाडीवरुन घराकडे परतत होते. त्यावेळी इमारतीबाहेर रस्त्यावर उभे राहून विरोधक आणि त्यांची पत्नी भांडत होते. त्यावेळी तक्रारदाराने त्यांना बाजूला होण्यासाठी 'एक्स्युज मी' असे इंग्रजी म्हटले आणि त्यावेळी विरोधक आणि त्यांची पत्नीने 'इंग्रजीत नको, मराठीत बोला' म्हणत असे म्हणत तक्रारदार आणि पुनम अंकीत गुप्ता आणि त्यांच्या बहिणीला बेदम मारहाण केली. मारहाणीत पुनम यांच्या नाकातील फुली तुटून नुकसान झाले. या प्रकरणी विष्णूनगर पोलिस ठाण्यात भारतीय दंडविधान कलम 115(2), 352, 324(4) अंतर्गत तक्रार नोंदवण्यात आली आहे. पोलिसांनी तिघा आरोपींविरोधात अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद केली आहे.

# गीतासार



### अध्याय ७
## ज्ञानविज्ञानयोगः

अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् । जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ७-५ ॥

ही आठ प्रकारचे भेद असणारी माझी अपरा म्हणजे अचेतन प्रकृती आहे. आणि हे महाबाहो अर्जुना, हिच्याहून दुसरी, जिच्यायोगे सर्व जग धारण केले जाते, ती माझी जीवरूप परा म्हणजे चेतन प्रकृती समज. ॥ ७-५ ॥

एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय । अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥ ७-६ ॥

सर्व सजीवमात्र या दोन प्रकृतींपासूनच उत्पन्न झालेले आहे, आणि मी सर्व जगाची उत्पत्ती आणि प्रलय आहे अर्थात सर्व जगाचे मूळ कारण आहे, हे तू जाण. ॥ ७-६ ॥

मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनञ्जय । मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ ७-७ ॥

हे धनंजया (अर्जुना), माझ्याहून निराळे दुसरे कोणतेही परम कारण नाही. हे संपूर्ण जग दोऱ्यात दोऱ्याचे मणी ओवावे, तसे माझ्यात गुंफलेले आहे. ॥ ७-७ ॥

रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभास्मि शशिसूर्ययोः । प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ॥ ७-८ ॥

हे कुंतीपुत्र अर्जुना, मी पाण्यातील रस आहे, चंद्रसूर्यातील प्रकाश आहे, सर्व वेदांतील ओंकार आहे, आकाशातील शब्द आणि पुरुषातील पुरुषत्व आहे. ॥ ७-८ ॥

# आरोग्य
## डिंकाचे फायदे

उन्हाळ्यात शरीर थंड आणि ऊर्जावान ठेवण्यासाठी आपण अनेक प्रकारच्या गोष्टींचे सेवन करतो. उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी लोक शेक, ताक, नारळ पाणी आणि ज्यूस इत्यादींचे सेवन करतात. याशिवाय तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही तुमच्या आहारात डिंक देखील समाविष्ट करू शकता. उन्हाळ्यात डिंक म्हणजेच गोंद कतीरा खाणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. त्याचे स्वरूप थंड आहे, म्हणून ते उन्हाळ्यात शरीराला थंडावा देते. याव्यतिरिक्त ते शरीराला डिहायड्रेशन आणि उष्माघातापासून वाचवण्यास देखील मदत करते. डिंग पोषक तत्वांनी समृद्ध आहे. त्यात प्रथिने, कॅल्शियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि फॉलिक ॲसिड सारखे अनेक पोषक घटक असतात, जे अनेक आरोग्य फायदे देतात. उन्हाळ्यात गोंद कतीरा खाल्ल्याने शरीराच्या अनेक समस्यांपासून मुक्तता मिळू शकते.

**शरीराला थंडावा देते-** उन्हाळ्यात उष्माघात, डिहायड्रेशन आणि उष्माघाताच्या समस्येपासून बचाव करण्यासाठी त्याचे सेवन मदत करू शकते.

**रोगप्रतिकारशक्ती वाढते-** शरीराची प्रतिकारशक्ती वाढविण्यास मदत करतात. याच्या सेवनाने अनेक प्रकारचे हंगामी आजार आणि संसर्ग टाळण्यास मदत होते.

**पचनसंस्था निरोगी ठेवतं-** ह्यात भरपूर फायबर असते, जे पचन सुधारण्यास मदत करते. याचे नियमित सेवन केल्याने गॅस, बद्धकोष्ठता, ॲसिडिटी आणि डायरियासारख्या समस्यांपासून आराम मिळतो

**ऊर्जा मिळते-** याच्या सेवनाने शरीराला शक्ती मिळते आणि अशक्तपणा आणि थकवा दूर होतो.

**त्वचेची ओलावा टिकवून ठेवते-** त्वचेशी संबंधित समस्यांपासून मुक्तता मिळविण्यासाठी देखील हे उपयुक्त आहे.

**डिंकाचे सेवन कशा प्रकारे करावे ?**

डिंकाचे सेवन करण्यासाठी, एक चमचा डिंक रात्रभर एका ग्लास पाण्यात भिजत ठेवा. हे पाणी गाळून सकाळी प्या. याशिवाय तुम्ही ते दूध, शेक, स्मूदी किंवा लिंबू पाण्यात मिसळून देखील सेवन करू शकता.

# राष्ट्रीय युनिकॉर्न दिन



दरवर्षी ९ एप्रिल रोजी राष्ट्रीय युनिकॉर्न दिन साजरा केला जातो . २०१५ मध्ये पहिल्यांदा हा दिवस साजरा करण्यात आला आणि हा दिवस अद्भुत, पौराणिक प्राण्यांचे, म्हणजेच युनिकॉर्नचे, साजरे करण्यासाठी खास असतो . पौराणिक कथांचे प्राणी म्हणून ओळखले जाणारे, युनिकॉर्न त्यांच्या एकाकी, सर्पिल, टोकदार शिंगे आणि गोंडस पांढरे कोट आणि शेपटीसाठी प्रसिद्ध आहेत. अलिकडच्या काळात पाश्चात्य संस्कृतीत ते लोकप्रिय झाले असल्याने, युनिकॉर्न अनेकदा इंद्रधनुष्याच्या रंगाच्या शेपट्या आणि मानेसह डोलताना दिसतात.

युनिकॉर्न आणि राष्ट्रीय युनिकॉर्न दिनाचा इतिहास काय आहे? सुमारे ६००० वर्षांपूर्वी बायबल आणि मेसोपोटेमियन कलेत युनिकॉर्न पहिल्यांदा दिसले होते , तसेच चीन, ग्रीस आणि भारतातील पौराणिक कथांमध्येही ते दिसले. प्राचीन ग्रीक पौराणिक कथांमध्ये, असे मानले जात होते की युनिकॉर्न भारतातील दूरच्या क्षेत्रात मुक्तपणे धावत होते. भूतकाळात काही ठिकाणी युनिकॉर्न शक्तिशाली आणि भयंकर प्राणी म्हणून पाहिले जात होते, परंतु त्यांना नेहमीच पवित्रता, जादू आणि कृपेचे प्रतीक म्हणून पाहिले गेले आहे. युनिकॉर्नच्या शिंगांमध्ये आजार बरे करण्याची आणि विषारी पाणी स्वच्छ करण्याची शक्ती असल्याचे म्हटले जात असे. मध्ययुगीन काळात, लोक नार्व्हल व्हेलच्या दातांना युनिकॉर्न शिंगे म्हणून विकत असत. युनिकॉर्नच्या पंकला 'आशीर्वाद' म्हणतात कारण असे मानले जाते की युनिकॉर्न फक्त सद्गुणी लोकांनाच दिसतात.

सेल्ट, रोमन आणि पर्शियन लोकांनी एका जादुई घोड्याचे वर्णन केले होते ज्याचे एकच शिंग होते जे शक्ती, स्वातंत्र्य आणि कृपा दर्शवते. युनिकॉर्न स्कॉटिश कोट ऑफ आर्म्सवर दिसतात, जिथे ते १५०० च्या मध्यापासून आहेत आणि युनिकॉर्न हा स्कॉटलंडचा राष्ट्रीय प्राणी आहे! युनिकॉर्नच्या गळ्यात एक साखळी असते, जी युनिकॉर्नच्या ताकदीचे आणि अदम्य स्वरूपाचे प्रतिनिधित्व करते असे मानले जाते, जे स्कॉटिश राजांच्या शक्तीचे प्रतीक आहे कारण ते युनिकॉर्नला वश करण्यास पुरेसे बलवान होते. सेल्टिक पौराणिक कथांमध्ये, युनिकॉर्न नेहमीच अत्यंत स्वतंत्र, पकडण्यास कठीण आणि गर्विष्ठ प्राणी म्हणून ओळखले जातात. जर तुम्हाला मुलांना युनिकॉर्न आणि स्कॉटलंडशी असलेल्या त्यांच्या नात्याबद्दल अधिक शिकवायचे असेल, तर आमचे स्कॉटलंडचे युनिकॉर्न रिसर्च टास्क वर्कशीट पहा , जे मुलांना युनिकॉर्न आणि स्कॉटलंडबद्दलचे तथ्य खरे आहेत की खोटे हे शोधण्यास सांगते.


# कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती,कल्याण

मा. शरदचंद्रजी पवार मुख्य बाजार आवार, एन टाईप इमारत, १ ला मजला,
कल्याण- शिळ रोड, कल्याण (प), जि. ठाणे ४२१ ३०१
दुरध्वनी क्रमांक (०२५१) २९७०३१६ ,e mail :- apmckalyan@rediffmail.com

**बांधकाम विभाग**
**फेर ई निविदा सुचना**

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती, कल्याण भाजीपाला बाजार विभाग-२ येथे ६३० के.व्ही. क्षमतेचा विद्युत ट्रान्सफॉर्मर उभारणे करीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून "बी-१" नमुन्यात कामाची ई निविदा मागवित आहे.

फेर ई निविदा फॉर्म व निविदेबाबतच्या सर्व अटि-शर्तीची संपूर्ण माहिती महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०९/०४/२०२५ ते १५/०४/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. भरण्यात आलेल्या फेर ई निविदा ह्या दि. १५/०४/२०२५ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत वरिल संकेतस्थळावर अपलोड करण्यात याव्यात. प्राप्त फेर ई निविदा दि. १६/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व फेर ई निविदा रद्द करण्याचा अधिकार सभापती यांनी राखून ठेवला आहे. याबद्दलचा निर्णय अंतिम व निविदाधारकांना बंधनकारक राहील.

फेर ई निविदेबाबतची अधिक माहिती www.mahatenders.gov.in व www.apmckalyan.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सही**
**(संजय जी. एगडे)**
**सचिव**
**कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण**

**सही-**
**(दत्तात्रय मोतीराम गायकवाड)**
**सभापती**
**कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण**

**जा.क्र. कृऊबास/विद्युत ट्रान्सफॉर्मर/फेर ई-निविदा/३४/२०२५**
**दि.०८/०४/२०२५**


# केडीएमसी आयुक्तपदी हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांची पालघर जिल्हा जिल्हाधिकारी पदावर नियुक्ती गेल्या आठवड्यात झाली होती त्यामुळे केडीएमसीचे आयुक्त पद रिक्त झाल्याने नव्या आयुक्त पदाची माळ कोणाच्या गळयात पडते या कडे सर्वाचे लक्ष लागून राहिले होते. अखेर आठवड्याभराच्या कालावधीनंतर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्त पदी हिंगोली जिल्हाचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांची नियुक्ती करण्यात आल्याचे राज्य शासनाने परिपत्रक काढून या बदलीची माहिती दिली आहे.

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त डॉक्टर इंदुराणी जाखड यांची १ एप्रिल रोजी पालघर जिल्हाधिकारी पदी बदली झाल्याने हे पद आठवडाभर रिक्त होते. त्यांच्या रिक्त झालेल्या आयुक्त पदी शासनाने हिंगोली जिल्हाचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांची नियुक्ती करण्यात आल्याचे परिपत्रका नुसार माहिती दिली आहे.



अभिनव गोयल हे २०१५ च्या बॅचचे आयएएस अधिकारी असून ते मूळचे मेरठ येथील आहेत. यांचे आई-वडील हे डॉक्टर असून आजोबा हे भौतिक शास्त्राचे तर आजी रसायनशास्त्राच्या प्राध्यापिका राहिल्या आहेत. आपल्या तिसऱ्या प्रयत्नात आयएएस परीक्षा ३६ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेले गोयल यांनी कानपूर आयआयटी मधून सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी घेतली आहे.

२०१८ ला नांदेड येथे सहाय्यक जिल्हाधिकारी त्यानंतर लातूर जिल्हा परिषदेचे सीईओ पदी ,मग त्यांनी धुळयाचे जिल्हाधिकारी पदाचा पदभार सांभाळला. त्या नंतर गेल्या वर्षी २९ ऑगस्ट २०२४ साली त्यांची हिंगोलीच्या जिल्हाधिकारी पदी नियुक्ती झाली होती. त्यांनी विविध जिल्ह्यात केलेल्या आपल्या चांगल्या कामाची छाप पाडली असून कल्याण डोंबिवली महापालिकेतही ते असेच कार्यरत राहतील अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# चैत्री एकादशी निमित्त श्री. विठ्ठल-रुक्मिणीची नित्यपूजा संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पंढरपूर** : चैत्री शुद्ध कामदा एकादशी निमित्त मंदिर समितीच्या वतीने श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेची नित्यपूजा संपन्न झाली. श्री विठ्ठलाची नित्यपूजा मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. शिवाजीराव मोरे व श्री रुक्मिणी मातेची नित्यपूजा लेखाधिकारी मुकेश अनेचा यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न झाली. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे, ॲड माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले व नित्य उपचार विभाग प्रमुख पांडुरंग बुरांडे उपस्थित होते.

मंदिरातील श्रींचा गाभारा, सोळखांबी व श्री संत नामदेव पायरी या ठिकाणी कामिनी, गुलाब, ड्रेसिंग सॉंग टेबल पाम, ऑर्किड, भगवा झेंडू, पिवळा झेंडू, वायसीस विटा, शेवंती, ब्ल्यू आणि पिंक डिजी, पांढरी शेवंती, अष्टर, चाफा व कमळ अशा विविध फुलांनी सजविण्यात आले आहे. विठ्ठल भक्त राजेंद्र पंढरीनाथ नाईक यांनी ही आरास केली आहे. या मनमोहक आरासामुळे मंदिर उजळून निघाला आहे.



महाराष्ट्रासह अन्य राज्यातील भाविकही मोठ्या प्रमाणात पंढरपुरात दाखल झाले आहेत. चैत्री एकादशीला भाविकांना सुलभ दर्शन व्हावे यासाठी मंदीर समितीच्या वतीने आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मंदिर समितीच्या वतीने दर्शनरांगेत व दर्शन मंडपात, स्वच्छ पिण्याचे पाणी, शौचालये, लाईव्ह दर्शन आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दर्शनरांग दर्शनमंडप, मंदीर व मंदीर परिसर या ठिकाणची वेळोवेळी स्वच्छता करण्यात येत आहे. दर्शनासाठी येणा-या भाविकांसाठी मंदिर समितीच्या वतीने विमा काढण्यात आला आहे. या यात्रेला येणा-या भाविकांना पुरेसा व अत्याधुनिक सोईसुविधा देणे व उष्णतेच्या दाहकतेमुळे भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने योग्य ती दक्षता मंदिर समिती मार्फत घेण्यात आली असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

दिवसेंदिवस उष्णतेची वाढणारी दाहकता लक्षात घेता, दर्शनरांगेत कुलर, थंड पिण्याचे पाणी, सरबत, मठ्ठा वाटप करण्यात येत आहे. याशिवाय, पत्राशेड व दर्शनमंडप येथे आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष, उपजिल्हा रूग्णालया मार्फत दर्शनमंडप येथे आयसीयू तसेच वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्याकडून मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध आहे. मंदिर परिसरात वैद्यकीय पथकासह दोन अद्यावत रूग्णवाहिका ठेवण्यात आल्या आहेत. तसेच गतवर्षीप्रमाणे पत्रा शेड येथे दशमी, एकादशी व द्वादशी दिवशी अन्नछत्र सुरू करण्यात आले असून, भाविकांना पूर्ण वेळ साबुदाणा / तांदळाची खिचडी वाटप करण्यात येत आहे. दर्शन रांगेतील एकही भाविक उपाशी राहू नये या दृष्टीने सारडा भवन येथे देखील खिचडी वाटप करण्यात येत आहे. तसेच श्री. संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप येथे चौकशी कक्ष उभारण्यात आला आहे. त्यामध्ये मराठी, इंग्रजी, हिंदी, कन्नड व तेलगू भाषा अवगत असलेले कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, भाविकांना ध्वनिक्षेपकाद्वारे वेळोवेळी सूचना देण्यात येत आहेत. चंद्रभागा वाळवंट येथे महिला भाविकांच्या सोईसाठी चेंजिंग रूम व दर्शनरांगेत हिरकणी कक्ष उभारण्यात आला आहे. पंढरीत दाखल झालेल्या भाविकांनी सध्या विठुरायाच्या दर्शनरांगेत मोठी गर्दी केली आहे. दर्शन रांगेत हजारो भाविक उभे आहेत, या वारकरी भाविकांना सोई सुविधा उपलब्ध करून देण्यास मंदिर प्रशासन सज्ज असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

# मुरबाड नगरपंचायतीची २ कोटी ४६ लाखाची विक्रमी कर वसुली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड नगर पंचायतीद्वारे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात कराद्वारे विक्रमी २ कोटी ४६ लक्ष एवढी वसुली करण्यात आली आहे अशी माहिती मुरबाड नगरपंचायत मुख्याधिकारी मनोज म्हसे यांनी दिली आहे.

सन २०२४-२५ या वर्षात विविध कराची मागणी व वसुली पुढीलप्रमाणे आहे.
मालमत्ता कर- १कोटी ९७ लक्ष (मागणी)
- १ कोटी ८६ लक्ष (वसुली) - ९४%
पाणीपट्टी - ८३ लक्ष (मागणी)
- ५१ लक्ष (वसुली) - ६१%
गाळाभाडे-१२ लक्ष (मागणी)-
९ लक्ष (वसुली) - ७५%

मुरबाड नगर पंचायतीचे मुख्याधिकारी मनोज म्हसे यांनी करवसुली करिता विशेष नियोजन करून तसेच सर्वांना कर वसुली बाबत चांगले मार्गदर्शन करून पथक निर्माण करण्यात आलेले. वसुलीकामी थकबाकीदारावर जप्ती



नोटीस बजावण्यात आलेली, तसेच नळजोडणी खंडित करणेची कार्यवाही करण्यात आली. काही वाणिज्य मालमत्ता सील करण्यात आल्या. यावेळी विक्रमी वसुली झाल्यामुळे मुख्याधिकारी यांनी मुरबाडकरांचे आभार व्यक्त केले आहे. तसेच यापुढेही मुरबाड नगर पंचायतीमध्ये सुखसोयी पुरवण्याकरिता नागरिकांनी कराचा नियमित भरणा करण्याकरिता आव्हान करण्यात आले आहे.

* यंदाचा उन्हाळा अतिशय कडक जाणवत असला तरी मुरबाड नगरपंचायतची कर वसुलीसाठी वसुली पथक उन्हा-तहणाचा विचार न करता वसुलीसाठी नेमलेली टीम चांगल्या पद्धतीने कर वसुली करत आहे.
*यंदा दोन कोटी ४६ लाखाची विक्रमी वसुली करण्यात आली आहे.
*विक्रमी वसुली झाल्याबद्दल मुरबाड करांचे मानले आभार.

# अवकाळी पाऊस व वादळ वाऱ्यातील नुकसानग्रस्तांना तात्काळ भरपाई द्या

## खासदार सुरेश म्हात्रे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद** : भिवंडी लोकसभा क्षेत्रातील गांव पाड्यांमध्ये अवकाळी पाऊस, गारपीट व वादळ वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानग्रस्तांना लवकरात लवकर पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी भिवंडी लोकसभा मतदार संघाचे खासदार सुरेश म्हात्रे (बाळया मामा) यांनी ठाणे जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

4 एप्रिल रोजी झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट व वादळ वाऱ्यामुळे भिवंडी लोकसभा मतदारसंघातील



भिवंडी, वाडा, शहापूर, मुरबाड व कल्याण तालुक्यासह बदलापूर भागात शेतकऱ्यांच्या शेतीसह नागरिकांच्या मालमत्ता व घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी व सामान्य नागरिक संकटात सापडले असून आपत्तीग्रस्तांचे लवकरात लवकर पंचनामे करून शेतकऱ्यांसह सर्वच आपत्तीग्रस्तांना शासनाकडून लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी खासदार सुरेश म्हात्रे यांनी केली आहे.

दरम्यान, सोमवारी शहापूर मधील नुकसानग्रस्त भागांत खासदार सुरेश म्हात्रे यांनी भेटी देत तहसीलदार यांना संपर्क साधून नुकसानग्रस्तांचे पंचनामे लवकरात लवकर करून त्यांना आर्थिक मदत मिळण्यासाठी तत्काळ प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तर शहापूर प्रमाणेच भिवंडी लोकसभा मतदारसंघातील अनेक तालुक्यांमध्ये शेतकरी व सामान्य नागरिकांना या नैसर्गिक आपत्तीचा फटका बसला आहे. त्यामुळे या सर्वांचेच पंचनामे करून लवकरात लवकर त्यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली असून या संदर्भात लवकरच पालकमंत्री व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील खासदार म्हात्रे भेट घेणार असल्याचे दिलेल्या प्रसिध्दी माध्यमांतून म्हटले आहे.

# सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाची पेण तालुका कार्यकारिणी घोषित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : अखिल महाराष्ट्र सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघ पेणची नवनिर्वाचित कार्यकारिणी 1 एप्रिल 2025 पासून तयार करण्यात आली असून अध्यक्ष राजाराम शिवराम गावंड कार्याध्यक्ष विश्वनाथ माया कोठेकर सरचिटणीस मुरलीधर गणपत म्हात्रे कोषाध्यक्ष प्रदीप बाळाराम म्हात्रे महिला प्रमुख श्रीमती उत्तरा प्रफुल्ल पाटील उपाध्यक्ष नंदकुमार थवई स.ग.नवाळे श्रीम. सीमा सुर्वे ,सौ. भारती म्हात्रे,सौ सुगंधा म्हात्रे,संयुक्त चिटणीस- अनिरुद्ध म्हात्रे परशुराम कडू, दिपक गावंड,श्रीम आशा म्हात्रे,सौ अलका मोकल विभाग प्रमुख हमरापूर -जगन्नाथ मोकल,वाशी वढाव - श्रीराम म्हात्रे,कासू - परशुराम कडू,वडखळ अरविंद चव्हाण, सल्लागार-वि.तु.म्हात्रे, हिरामण तुरे, रत्नाकर म्हात्रे,मंगलदास ठाकुर म्हणून निवड करण्यात आली अशी माहिती रायगड अध्यक्ष अमरचंद पाटील सरचिटणीस गुरुनाथ पाटील यांनी दिली.

# नवी मुंबई पोलिसांना सायबर प्रशिक्षण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई**: नवी मुंबई पोलीस तंत्रखेही व्हावे तसेच सायबर गुन्ह्याची उकल करताना ती योग्य पद्धतीने व्हावी यासाठी नवी मुंबई पोलिसांना सायबर प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली आहे. मागील दोन महिन्यांत ३९० कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षितता आणि सायबर गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण देण्यात आहे. यामध्ये नव्याने पोलीस दलात भरती झालेल्या कर्मचा-यांचाही सामावेश होता. या प्रशिक्षणामुळे सायबर गुन्ह्यांचा शोध घेणे पोलिसांना शक्य होणार आहे.

गेल्याकाही वर्षांमध्ये मोठयाप्रमाणात सायबर गुन्हे घडत आहेत. सायबर गुन्हेगारांकडून प्रामुख्याने सर्वसामान्य नागरिकांना लक्ष केले जात आहे. विविध माध्यमांतून सायबर गुन्हेगार नागिरकांची फसवणूक करत आहेत. हे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. फसवणूक झालेला व्यक्ती पोलीस ठाण्यात आल्यानंतर गुन्हा दाखल होतो. त्यानंतर तपासात पोलिसांच्या हाती काही लागतेच असे नाही. तपास अधिकारी, कर्मचारी तंत्रखेही असेल तर तपासात गती येत असते. त्यामुळे पोलीस अधिकारी, कर्मचारी तंत्रस्रेही असणे आवश्यक असते.

नवी मुंबई पोलिसांनी त्यांच्या पोलीस दलातील कर्मचाऱ्यांना तंत्रखेही बनविण्याच्या दृष्टीने युनायटेड वे मुंबई आणि फेडरल एक्सप्रेस कॉर्पोरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा आणि सायबर गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण कार्यशाळा सुरू केली होती. या प्रशिक्षण वर्गामध्ये तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. ३९० कर्मचाऱ्यांना यावेळी प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रशिक्षण वर्गात काही तांत्रिक बाबींविषयी माहिती देण्यात आली. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनी तपासा दरम्यान काय करायला हवे, केंद्र सरकाच्या सायबर पोर्टरचा वापर कसा करावा, तांत्रिक विश्लेषण करताना योग्य माहिती कशी संकलित करावे अशा विविध बाबतीत कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन झाले.




# मुख्यमंत्र्यांनी इंडिया ग्लोबल फोरममध्ये मांडला विकासाचा रोडमॅप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी विना अडथळा सुविधा पुरविली जात आहे. राज्यातील सर्वच भागात गुंतवणूक व्हावी यासाठी इको सिस्टीम तयार केली जात आहे. त्यामुळे येत्या पाच वर्षांत राज्यातील सर्वच भागाचा संतुलित विकास झाल्याचे दिसेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.
बांद्रा कुर्ला संकुलातील जिओ वर्ड सेंटर येथे आयोजित 'इंडिया ग्लोबल फोरम नेक्स्ट २५' या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते . यावेळी इंडिया ग्लोबल फोरमचे संस्थापक मनोज लढवा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, उद्योग विभागाचे सचिव पी. अन्बलगन आदींसह उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.




### कुशल मनुष्यबळाची कमतरता भासणार नाही

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी नवनवीन संधी निर्माण करत आहोत. जागतिक पुरवठा साखळीसाठीही सुविधा उपलब्ध करत आहोत. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात सुद्धा महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. याशिवाय जगभरातील तसेच देशातील महत्वाच्या उद्योग कंपन्या महाराष्ट्रात आहेत. उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ निर्माण करत असून त्यासाठी कौशल्य विद्यापीठ कार्यरत आहे. त्यामुळे राज्यात कुशल मनुष्यबळाची कमतरता भासणार नाही. हरित व स्मार्ट तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांवरही आम्ही भर देत आहोत.

ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेत एमएमआरचे महत्वाचे योगदान

महाराष्ट्राला तीन ट्रिलियन डॉलर अर्थ व्यवस्था करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेशाचे मोठे योगदान असणार आहे. एकट्या एमएमआर क्षेत्रात १.५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था उभारण्याची क्षमता आहे. त्यामुळे या भागावर जास्त फोकस आहे. मुंबई ही 'फिनटेक कॅपिटल' असून नवी मुंबईत तिसरी मुंबई तयार करत आहोत. या ठिकाणी एज्युसिटी, इनोव्हेशन सिटी निर्माण होत आहे. एज्युसिटी मध्ये जगातील सर्वात मोठे विद्यापीठ येण्यास उत्सुक असून ५ विद्यापीठे अंतिम होत आहेत. त्याचबरोबर नवी मुंबई विमानतळ लवकरच सुरू होणार असून अटल सेतूमुळे विमानतळ व परिसराशी कनेक्टिव्हिटी वाढली आहे, असे श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

> **पुढील पाच वर्षांत राज्याचा संतुलित विकास दिसेल**
> - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

देशातील सर्वात मोठे बंदर वाढवण येथे होत आहे. तसेच समृद्धी महामार्गही या बंदराशी जोडले जाणार आहे. त्यामुळे या परिसरात चौथी मुंबई निर्माण होत आहे, असेही त्यांनी सांगितले.

### राज्यातील ग्रामीण भागावरही लक्ष

मुंबई महानगर प्रदेश बरोबरच राज्यातील ग्रामीण भागासह तर भागाच्या विकासावरही लक्ष देण्यात येत आहे. पुण्यात ऑटोमोबाईल, छत्रपती संभाजीनगरमध्ये इलेक्ट्रिक वाहन उद्योग हब होत आहे. तसेच गडचिरोली जिल्हा हा देशातील नवीन स्टील हब म्हणून उदयास येत आहे. तर विदर्भात सोलर उत्पादन क्षेत्र वाढत आहे. तसेच समृद्धी महामार्गामुळे १५ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना, उद्योजकांना लाभ होणार आहे. नवीन प्रस्तावित शक्तिपीठ मार्गामुळे मराठवाड्याचा फायदा होणार आहे. शिर्डी, पुणे, नागपूर येथे विमानतळाचे काम सुरू आहे. तर दुष्काळमुक्तीसाठी सुमारे तीन लाख कोटींचे चार नदी जोड प्रकल्प राबविण्यात येत असून विदर्भात कॅनॉलने पाणीपुरवठा करण्यासाठी प्रकल्प उभारण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

८५ टक्के सामंजस्य करार मार्गी

राज्य सरकारने केलेल्या सामंजस्य करारातील ८५ टक्के करार हे मार्गी लागत असून उर्वरित २० टक्के करार प्रत्यक्षात येण्यासाठी विशेष लक्ष देण्यात येत आहे. लवकरच हे करारही मार्गी लागतील. यासाठी उद्योगांना लागणाऱ्या सर्व सुविधा, जमीन तसेच परवाने देण्याचे काम राज्य शासन वेगाने करत असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.


## कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती,कल्याण

मा. शरदचंद्रजी पवार मुख्य बाजार आवार, एन टाईप इमारत, १ ला मजला,
कल्याण- शिळ रोड, कल्याण (प), जि. ठाणे ४२१ ३०१
दुरध्वनी क्रमांक (०२५१) २९७०३१६ ,e mail :- apmckalyan@rediffmail.com

### बांधकाम विभाग
### फेर ई निविदा सुचना

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती, कल्याण अन्नधान्य बाजार विभाग-२ येथे ६३० के.व्ही. क्षमतेचा विद्युत ट्रान्सफॉर्मर उभारणे करीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून "बी-१" नमुन्यात कामाची फेर ई-निविदा मागवित आहे.

फेर ई निविदा फॉर्म व निविदेबाबतच्या सर्व अटि-शर्तींची संपूर्ण माहिती महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०९/०४/२०२५ ते १५/०४/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० बाजेपर्यंत उपलब्ध होईल. भरण्यात आलेल्या फेर ई निविदा ह्या दि. १५/०४/२०२५ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत वरिल संकेतस्थळावर अपलोड करण्यात याव्यात. प्राप्त फेर ई-निविदा दि. १६/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व फेर ई निविदा रद्द करण्याचा अधिकार सभापती यांनी राखून ठेवला आहे. याबद्दलचा निर्णय अंतिम व निविदाधारकांना बंधनकारक राहील.

फेर ई निविदेबाबतची अधिक माहिती www.mahatenders.gov.in व www.apmckalyan.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही
(संजय जी. एगडे)
सचिव
कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती,
कल्याण

सही-
(दत्तात्रय मोतीराम गायकवाड)
सभापती
कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती,
कल्याण

जा.क्र. कृऊबास/विद्युत ट्रान्सफॉर्मर/फेर ई-निविदा/३६/२०२५
दि.०८/०४/२०२५


# आजचा दिवस आपल्यासाठी ऐतिहासिक

**- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**


## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणकडून चार लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** आजचा दिवस महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक ठरला आहे. मुंबई मेट्रोपॉलिटन रीजन डेवलपमेंट अथॉरिटी कडून देशातील सर्वात मोठा सामंजस्य करारावर हस्ताक्षर सोहळा पार पडला. एकाच वेळी ४ लाख ७ हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करारावर सह्या करण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.
जियो वल्ड सेंटर येथे आयोजित इंडिया ग्लोबल फोरम २०२५ च्या कार्यक्रमात विविध सामंजस्य करार केल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, हुडकोचे अध्यक्ष संजय कुलक्षेत्र, आर ई सी आणि पी एफ सीचे अध्यक्ष परमिंदर चोप्रा, आय आर एफ सी चे संचालक शेली वर्मा, एन ए बी एफ आय डी चे व्यवस्थापकीय संचालक राजकीरण राय, मॅग्रम आइस्क्रीम कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजित भटाचार्य, उद्योग विभागाचे सचिव पी अनबलगम आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, एमएमआरडीएने विद्युत मंत्रालयाच्या महारत्न कंपनी आरइसी लिमिटेड, पावर फाइनेंस कॉर्पोरेशन, हाऊसिंग एंड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (हुडको), इंडियन रेलवे फाइनेंस कॉर्पोरेशन, नॅशनल बँक फॉर फाइनेंसिंग इन्फ्रास्ट्रक्चर आणि डेवलपमेंट यांसारख्या कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले. हे सामंजस्य करार मिनीरत्न, महारत्न आणि नवरत्न कंपन्यांसोबत केल्याने अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. हे सामंजस्य करार केल्यामुळे एमएमआर (मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन) मध्ये इन्फ्रास्ट्रक्चरच्या विकासाला गती मिळेल. गेल्या तीन वर्षांत दावोसच्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये २० लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत, जे एक मोठे रेकॉर्ड आहे. यावर्षी एमएमआरडीएने दावोसमध्ये साडे तीन लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार करून त्याचे पालनही केले आहे. हे सामंजस्य करार मुंबई आणि त्याच्या आसपासच्या क्षेत्रातील विकासाला एक मोठे चालना देईल.



भारत आता ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर (जीसीसी) हब म्हणून उभा राहिला असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, बेंगलोर, हैदराबाद, पुणे आणि गुड़गाँवमध्ये १,५०० पेक्षा जास्त जीसीसी कार्यरत आहेत. जगभरातील प्रमुख कंपन्या जसे की गूगल, ॲमेझॉन, गोल्डमॅन सॅक्स आणि जेपी मॉर्गन या कंपन्यांचे जीसीसी भारतात कार्यरत आहेत. पुणे मध्ये आज एक नवीन जीसीसी सुरू करण्यात आले आहे, ज्यामुळे भारताच्या तरुणांना जगातील सर्वात मोठ्या कंपन्यांशी काम करण्याचे संधी मिळेल. जीसीसी च्या माध्यमातून भारताची क्षमता जागतिक स्तरावर वाढवली जात आहे. भारताच्या लाखो इंजिनीअर्स, आयटी तज्ज्ञ आणि कौशल्यपूर्ण युवकांना जीसीसीमध्ये संधी मिळत आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), रोबोटिक्स आणि डेटा ॲनालिटिक्स सारख्या अत्याधुनिक क्षेत्रात भारताला जागतिक नेता बनवण्याचे संधी उपलब्ध झाली आहे. एमएमआर च्या क्षेत्राला २०३० पर्यंत ३०० बिलियन डॉलरच्या जीडीपी पर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी १३५ बिलियन डॉलरचा गुंतवणूक प्राप्त करणे आवश्यक आहे. यामुळे आणखी २८ ते ३० लाख लोकांना रोजगार उपलब्ध होईल. राज्याने गेल्या तीन वर्षांत गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण तयार केले आहे. वर्ल्ड क्लास इन्फ्रास्ट्रक्चर, कौशल्यपूर्ण मनुष्यबळ आणि मजबूत शासन यामुळे महाराष्ट्र हे आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक व्यवसायांसाठी पसंतीचे ठिकाण बनले आहे. इलेक्ट्रिक मोबिलिटी, लॉजिस्टिक्स, सेमीकंडक्टर विनिर्माण आणि एआय, हेल्थटेक, एडटेक अशा क्षेत्रात गुंतवणकीस प्रोत्साहन दिले जात आहे.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या पाच ट्रिलियन डॉलर लक्ष्याच्या दिशेने हे सर्व उपक्रम महत्त्वाचे आहेत. जीसीसी आणि इतर व्यवसायिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती भारताच्या अर्थव्यवस्थेला मजबुती देत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना त्यांच्या योग्य मार्गदर्शनासाठी आणि समर्थनासाठी विशेष आभार व्यक्त करतो. त्यांच्या नेतृत्वाखाली, भारत एक प्रबळ आणि गतिमान अर्थव्यवस्था बनत आहे. आताच्या आणि भविष्यातील इन्व्हेस्टमेंटसाठी महाराष्ट्र एक खुला आणि आकर्षक प्रदेश आहे. यासाठी आपण एकत्र काम करून येत्या काळात यशस्वी होऊ शकतो.

# कल्याणात उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यू

## पालिका रुग्णालयाच्या हलगर्जी पणामुळे मृत्यू झाल्याचा कुटुंबियांचा आरोप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** पुण्यात मंगेशकर हॉस्पिटल मध्ये प्रसूती दरम्यान महिलेला दाखल करून न घेतल्याने महिलेचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असताना पुनः एकदा रुग्णालयाच्या हलगर्जी पणा मुळे महिलेचा मृत्यू झाल्याची घटना कल्याण मध्ये घडली आहे. त्यामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या कल्याण पूर्वेतील शक्तीधाम रुग्णालयात कुटुंब नियोजनाच्या ऑपरेशान साठी दाखल करण्यात आलेल्या एका तीस वर्षीय महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. या घटनेमुळे पालिकेच्या आरोग्य विभागातील हलगर्जी पणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.



शांती देवी मौर्या (३०)असे मयत महिलेचे नाव आहे. या घटने प्रकरणी मयत महिलेचे पती अखिलेश मौर्या यांनी सांगितले की माझी पत्नी शांती देवी हिला मुतखड्याचा त्रास असल्याने तिच्या पोटात सारखे दुखत होते. त्यातच पालिकेच्या आरोग्य विभागातील आशा सेविका आमच्या परिसरात सर्वे साठी आल्या असता त्यांना माझ्या पत्नीने पोटात दुखत असल्याचे सांगितल्याने त्यांनी मूतखड्याच्या आजारावर उपचारासाठी दाखल केले असता शांती देवी गर्भवती असल्याचे निदर्शनास आले.

पहिले तीन मुलं असताना गर्भपात करून कुटुंबनियोजनाचे ऑपरेशन करण्याचे ठरले असता तिचे सोमवारी ऑपरेशन करण्यासाठी ऑपरेशन थिएटर मध्ये नेले असता तिच्या वर उपचारा पूर्वी प्रकृती खालावल्याने तिला दुसऱ्या खाजगी हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यासाठी आम्हाला सांगितले. नजीकच्या खाजगी रुग्णालयात रुग्णवाहिके मधून दाखल करण्यासाठी नेत असताना खाजगी रुग्णालयात दाखल करण्या पूर्वी तिचा मृत्यू झाला. हा मृत्यू पालिकेच्या हलगर्जी पणा मुळे झाल्याचाआरोप मयत महिलेचा पती अखिलेश व त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे.

स्थानिक आमदार सुलभा गायकवाड यांनी देखील महिलेच्या मृत्यूचा जाब डॉक्टरांना विचारत जे जे रुग्णालयात पोस्टमार्टमसाठी मृतदेह पाठवावे असे ठणकवले. तसेच शिवसेना शहर प्रमुख निलेश शिंदे, यांनी सांगितले कि, या महिलेच्या मृत्यूस जे जे डॉक्टर जबाबदार असतील त्यांना शिक्षा झालीच पाहिजे, पीडित कुटुंबांना न्याय दिला जाईल अशी आश्वासन दिले.

तर याबाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, या प्रकरणाची चौकशी सुरू असून याबाबतचा अहवाल आल्यानंतर जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल. तसेच आशा वर्कर यांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी शासनाकडून टार्गेट देण्यात येते, त्या दृष्टीने देखील तपास केला जाईल असे त्यांनी सांगितले.

तर शक्तीधाम प्रसूतीगृहात महिलेच्या मृत्यू नंतर मृत महिलेचा जे जे रुग्णालयातून पोस्टमार्टम करून आणण्यात आले मात्र मृत्यदेह ताब्यात घेण्यास कुटुंबाने नकार दिला होता. रुग्णालया बाहेर महिलेच्या घरच्यांनी हॉस्पिटल च्या बाहेर बसून ठिय्या आंदोलन केले. या आंदोलना मध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्ते देखील सहभागी झाले होते. जोपर्यंत संबंधित डॉक्टर वर गुन्हा दाखल केले जात नाही, तोपर्यंत मृतदेहाचा अंतिम संस्कार न करण्याचा निर्णय कुटुंबाने घेतला आहे.

# ॲड.मंगेश नेने यांना 'आदर्श शिक्षणतज्ञ' पुरस्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** प्रिंट इलेक्ट्रॉनिक मीडिया, ज्येष्ठ पत्रकार, रायगड जिल्हामध्ये विशेष सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक यांच्यासहित विविध क्षेत्रात करीत सांस्कृतिक असे अनेक पुरस्कार घेणारे पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई रायगड जिल्हा पुरस्काराने त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. पनवेल तालुक्याच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते अनेक वर्षापासून सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, सांस्कृतिक, कला, क्रीडा आदी क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याने त्यांना आदर्श शिक्षणतज्ञ



पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे सदरचा कार्यक्रम १३ एप्रिल रोजी होणार आहे.यावेळी जिल्ह्यातील ज्येष्ठ मंडळी उपस्थित राहणार आहेत.

## केडीएमसीच्या वतीने
# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीची जय्यत तयारी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** सोमवार दि. 14 एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी कल्याण डोंबिवली महापालिका परिक्षेत्रात संपन्न होणाऱ्या कार्यक्रमांच्या पूर्व तयारीबाबत आयुक्त दालनात सोमवारी संपन्न झालेल्या बैठकीत महापालिका आयुक्त हर्षल गायकवाड यांनी या दिवशी महापालिकेमार्फत करायच्या कामकाजाच्या अनुषंगाने उपस्थित अधिकाऱ्यांना निर्देश दिले.




दि. 11 व 12 एिप्रल रोजी सर्व संबंधित परिसरात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत स्वच्छता केली जाईल, अशी माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त अतुल पाटील यांनी दिली. तसेच महापालिका परिक्षेत्रातील सर्व पुतळे अग्निशमन विभागामार्फत स्वच्छ केले जातील आणि कल्याण व डोंबिवलीतील मिरवणूक मार्गावरील झाडांच्या फांद्या छाटण्याची कारवाई यापूर्वीच सुरु केली असल्याचे प्रतिपादन मुख्य उद्यान अधिक्षक संजय जाधव यांनी या बैठकीत बोलताना केले.

मिरवणूक मार्गावरील अडथळा ठरणारी अतिक्रमणे, टपऱ्या निष्कासित कराव्यात त्याचप्रमाणे कार्यक्रमांच्या प्रमुख ठिकाणी म्हणजे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान कल्याण (पश्चिम), ड प्रभाग क्षेत्र कार्यालय व डोंबिवली (पूर्व) विभागीय कार्यालयानजीक, रुग्णवाहिकेसहित वैद्यकीय सेवा सदर दिवशी उपलब्ध ठेवावी, असे निर्देश महापालिका आयुक्त हर्षल गायकवाड यांनी या बैठकीत दिले.

या तिन्ही प्रमुख ठिकाणी रोषणाई व जनरेटरची व्यवस्था कार्यक्रमाच्या दिवशी केली जाईल अशी माहिती विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली. तर कल्याण मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानात पेंटींगचे काम सुरु असून, ते कार्यक्रमापूर्वी पूर्ण करण्यात येईल. तसेच या उद्यानाबाजूला रस्त्यावर पडलेले स्मार्टसिटीचे सामान मार्गी लावण्याचे कामही करण्यात येईल, अशी माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी या बैठकीत दिली.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
**सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा** मुंबई विद्यापीठाशी संलग्न

ADMISSION OPEN 2024-25




११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE

UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS

POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY

7719814142
9130580111


# जिल्हा परिषदेत कर्मचारी यांचे कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण

**आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज असून प्रशासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्ता वापर आवश्यक - मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचा 100 दिवसांचा सात कलमी कृती कार्यक्रम अंतर्गत जिल्हा परिषदेत कर्मचारी यांचे कृत्रिम बुद्धीमत्ता या विषयाबाबत प्रशिक्षण कार्यक्रम आज मंगळवारी, दि.08 एप्रिल, 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज आहे. प्रशासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्ता वापर आवश्यक असून जिल्हा परिषदेच्या प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी प्रशिक्षण आत्मसात करा. आधुनिक तंत्रज्ञानाचा दररोजच्या कामकाजात वापर करून कामाला वेगळ्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आला आहे. यासाठी काग्निडॉल्फ कंपनीचे संस्थापक मयूर तांबे, क्लाऊडटेल्स कंपनीचे सहव्यवस्थापक स्वप्निल बावा यांनी मार्गदर्शन करण्यासाठी पुढाकार घेतला ही आपल्या सर्वांसाठी आनंदाची बाब आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) अविनाश फडतरे यांनी प्रास्ताविक करताना म्हणाले की, "१०० दिवसांचा कृती कार्यक्रम अंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत असून कर्मचाऱ्यांना काम करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कामामध्ये गती, पारदर्शकता आणण्यासाठी आणि लोकोपयोगी कामकाज उत्तमरीत्या करण्यासाठी प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. या प्रशिक्षणाचा सर्व कर्मचाऱ्यांना काम करताना येणाऱ्या अनेक अडचणींवर मात करता येईल."

सॉफ्टवेअर डिझाईन, डेव्हलपमेंट आणि इम्प्लिमेंट करण्यासाठी काग्रिडॉल्फ कंपनीचे संस्थापक मयूर तांबे, क्लाऊडटेल्स कंपनीचे सहव्यवस्थापक स्वप्निल बावा यांनी कॅनवा पावर पॉइंट प्रेझेंटेशन, चॅट जी पी टी, क्लॉड, आयडियो ग्राम अशा ए आय टूल्स सारख्या विविध आधुनिक तंत्रज्ञानाचा शासकीय कामकाजात होणाऱ्या वापराबद्दल उत्तम प्रशिक्षण दिले. यावेळी कर्मचाऱ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणींबाबत देखील सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) अविनाश फडतरे, मुख्य लेख व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहीतुले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, पशुसंवर्धन विभाग प्रमुख डॉ. समीर तोडणकर, कार्यकारी अभियंता प्रकाश सासे, जिल्हा कृषी अधिकारी एम. एम. बाचोटीकर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे तसेच कोग्निडॉल्फ व क्लाऊडटेल्स येथील प्रशिक्षक मिहीर लोहकरे, रोहन फोन्सेका, आईशा शेख, पल्लवी ठाकूर, जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशिक्षण पूर्णत्वास आनण्यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे व सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी- कर्मचारी यांनी नियोजन केल्याबद्दल प्रशिक्षणार्थीनी अभिनंदन केले.

> कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावरील अत्यंत उपयोगी आणि दर्जेदार प्रशिक्षण आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणाचा शासकीय कामकाजात खूप जास्त उपयोग होणार आहे आणि शासकीय कामकाज कमी वेळेत जास्तीत जास्त काम करण्यासाठी मदत होईल. तसेच कामांमध्ये जास्त पारदर्शकता येण्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत उपयोगी असे प्रशिक्षण राबविण्यात आले आहे. कमीत कमी वेळेत जास्त काम करून लोकोपयोगी काम करण्यासाठी मदत होईल
> **- कनिष्ठ सहाय्यक लेखा (अर्थ विभाग) गंगाधर बोरकर**

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील सर्व कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी. तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी या हेतूने दि.08 एप्रिल ते 14 एप्रिल 2025 या कालावधीत "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमांचा जास्तीत जास्त नागरीकांना लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सुनिल जाधव यांनी केले आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील शाळा महाविद्यालये वसतिगृहात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन, विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे प्रातिनिधीक स्वरुपात लाभार्थ्यांना लाभाचे वाटप, समतादूतामार्फत ग्रामीण व शहरी भागामध्ये पथनाटय व लघुनाटिकाव्दारे विविध योजनांचे प्रबोधन, मार्जिन मनी योजनेंतर्गत कार्यशाळेचे आयोजन, महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याविषयी व्याख्यान, संविधान जागर, महिला मेळाव्याचे आयोजन, जेष्ठ नागरीकासाठी जनजागृती शिबीर व मेळावा तसेच आरोग्य शिबीर, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यामधून स्वच्छता अभियान, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमीत्त अभिवादन व इतर कार्यक्रम, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभीमान मेळावा व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीमार्फत ऑनलाईन व्हॅलिडीटी प्रमाणपत्राचे प्रदान इ. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांनी विमा संरक्षित ई-पीक पाहणी करुन घ्यावी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : रायगड जिल्ह्यामध्ये आंबिया बहार सन-2024-25 करिता युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी मार्फत आंबा व काजू फळपिकांसाठी फळपीक विमा योजना योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी विमा संरक्षित क्षेत्राची ई-पीक पाहणी पूर्ण करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

दि.12 जून, 2024 च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यात पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना राबविण्यात येत आहे. पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेच्या निकषानुसार या विमा योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना ई-पीक पाहणे करणे बंधनकारक आहे. ज्या शेतकऱ्यांनी आंबिया बहार सन 2024-25 मध्ये फळपीक विमा योजनेत सहभाग घेतलेला आहे. परंतु फळपिकांची ई-पीक पाहणी डिजीटल क्रॉप सर्व्हे (DCS) मोबाईल ॲपद्वारे केलेली नाही त्यांनी दि.25 एप्रिल 2025 पर्यंत विमा संरक्षित क्षेत्राची ई-पीक पाहणी पूर्ण करुन घ्यावी. अन्यथा योजनेच्या निकषानुसार ई-पीक पाहणी नोंद नसलेले सर्व विमा अर्ज रद्द करण्यात येतील व फळपीक विम्याचा लाभा दिला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

# 'आपले सरकार' पोर्टलची सेवा पाच दिवस बंद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : 'आपले सरकार' पोर्टलची सेवा नियमित व तांत्रिक देखभालीसाठी १० ते १४ एप्रिल, २०२५ अशी पाच दिवस बंद राहील. या कालावधीत 'आपले सरकार' सेवा पोर्टलमार्फत दिली जाणारी कोणतीही सेवा उपलब्ध असणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी) यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

या काळात कार्यालयीन कामकाजाचा फक्त एक दिवस वगळता उर्वरित सर्व दिवस सार्वजनिक सुट्टीचे आहेत. राज्यातील सर्वसामान्य नागरिक, ग्रामीण आणि शहरी भागातील 'आपले सरकार' केंद्र चालक, 'सेतू' केंद्र चालक, संबंधित ग्रामपंचायती आणि शासकीय कर्मचारी यांनी कृपया या पूर्वसूचनेची नोंद घ्यावी, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# राज्य रब्बी स्पर्धेत ठाणे संघ उपविजयी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : श्री शिव छत्रपती शिवाजी क्रीडा संकुल पुणे येथे पार पडलेल्या 12 व्या राज्य रब्बी अजिंक्यपद स्पर्धेत ठाणे जिल्ह्याचा पुरुषांच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. साखळी सामन्यात ठाणे पुरुष संघाने सोलापूर,धुळे संघाना पराभूत करून स्पर्धेत सर्वाधिक गुण कमावून उप उपांत्य फेरी च्या सामन्यात ठाणे संघाने सातारा संघाचा 43 -0 असा पराभव करून उपांत्य फेरीत मजल मारली.

उपांत्य फेरीच्या सामन्यात ठाणे संघाने पुणे संघास 24-10असा पराभव करून अंतिम सामन्यात प्रवेश केला. अंतिम सामना ठाणे विरुद्ध मुंबई शहर असा झाला. या सामन्यात मुंबईशहर संघाकडून 33-5असा पराभव पत्करावा लागला व ठाणे जिल्हा पुरुष रग्बी संघ स्पर्धेत उपविजेता ठरला. ठाणे संघाकडून हर्षल डोळस (कर्णधार), आर्यन दीक्षित, अभिषेक यादव, विकास यादव,अनिकेत सिंग, निशांत चौहान,पंकज सिंग, अनिकेत सिंग,शिवप्रसाद शर्मा,अनिकेत केवने, देवेश देवाडीगा, गणेश उपाध्याय ह्या खेळाडूंनी उत्कृष्ट असे खेळाचे प्रदर्शन केले. संघ प्रशिक्षक प्रमोद पारसी, यदनेश्वर बागराव यांनी मार्गदर्शन केले.

# आतकोली डम्पिंगमुळे नागरीकांच्या जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झालाय

## - आमदार किसन कथोरे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : ठाणे महापालिकेच्या भिवंडी तालुक्यातील आतकोली येथील डम्पिंग प्रकल्पामुळे नागरीकांच्या जिवन मरणाचा प्रश्न निर्माण झालाय त्यामुळे संघर्षा शिवाय पर्याय नाही असे मुरबाड विधानसभा क्षेत्राचे आमदार किसन कथोरे यांनी आतकोली येथील आंदोलनात आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले.

ठाणे महापालिकेने आतकोली येथील ८६ एकर जागेत शास्त्रोक्त पद्धतीने डम्पिंग प्रकल्प सुरू केला असुन ठाणे शहरातील हजारो टन कचरा आणण्यास सुरुवात केली असुन दुर्गंधीमुळे व परिसरातील हवा प्रदुषीत होऊन २० गावातील हजारो नागरीकांचे आरोग्य धोक्यात येणार आहे तसेच परिसरातील विकासकामांवर सुध्दा परिणाम होणार असल्याने डम्पिंग विरोधी स्थानिक पंचक्रोशी संघर्ष समितीच्या वतीने रमेश शेलार, प्रकाश भोईर, विजय पाटील, अँड. संदीप जाधव, भास्कर माळी यांच्या मार्गदर्शनाखाली रिनायसेंस कंपनीजवळील मैदानावर सोमवारी एक दीवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला नागरीकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी शिवसेना नेते प्रकाश पाटील आमदार शांताराम मोरे माजी केंद्रीय मंत्री कपील पाटील, कुणबी सेनाप्रमुख विश्वनाथ पाटील, शिवसेना उबाठा गटाच्या उपनेत्या ज्योतीताई ठाकरे, जिजाऊ संघटनेच्या जिल्हाध्यक्ष मोनीकाताई पानवे, जिल्हाप्रमुख विश्वास थळे, काँग्रेस आय जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे शिवसेना (उबाठा) तालुकाप्रमुख कुंदन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष गणेश गुळवी, प्रदेश युवक काँग्रेस सरचिटणीस विरेन चोरघे, भिंवडी वकील संघटनेचे अँड. मनीष भोईर, उद्योजक पंडीत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते उपस्थीत मान्यवरांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. तर सगळयांना बरोबर घेऊन कुठल्याही परिस्थितीत हे डम्पिंग बंद झाले पाहिजे त्यासाठी सर्वांनी संघर्ष सुरू ठेवा असे आमदार कथोरे यांनी आपल्या भाषणात सांगुन डम्पिंग जागेवर इंजिनिअरिंग कॉलेज, शैक्षणिक हब सारखे प्रकल्प आले असते तर नागरीकांनी त्यांचे स्वागत केले असते. मात्र कचऱ्यासारखी घाण आमच्या डोक्यावर आणुन टाकायचा विचार केला असेल तर संघर्षाशिवाय पर्याय नाही म्हणून जो संघर्ष आज केलाय त्याला मनापासुन धन्यवाद देतोय व तुमच्यासोबत मी दोन पावले पुढे जाऊन डम्पिंग प्रकल्प कसा बंद होइल यासाठी सर्वांनी प्रयत्न करुया तसेच ठाणे महापालिकेने त्यांच्या हद्दीत कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रयत्न करावा असे मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी मार्गदर्शन करताना आतकोली येथील भाषणात सांगितले. तर उपस्थीत प्रमुख लोकप्रतिनिधींनी लवकरच डम्पिंग विरोधी स्थानिक संघर्ष समिती परिसरातील लोकप्रतिनिधी यांची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची भेट घडवून आणुन डम्पिंग बंद करण्यासाठी तोडगा काढणार असल्याचे सांगितले. यावेळी परिसरातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, विवीध राजकीय पक्ष, संघटनेचे, पदाधिकारी, शालेय विद्यार्थी, हजारो नागरिक महीला आंदोलनात सहभागी झाले होते हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी बारकु राऊत, प्रदिप भोईर, दिनेश भोईर, महेश राऊत, विजय भोईर, पंकज भोईर, गणपत मते, विजय राऊत, अशोक पाटील, सुरेश चंदे हरेश राऊत, जगदीश राऊत, संदीप शेलार, नितीन शेलार, सुरेंद्र शेलार,यांनी मेहनत घेतली.

# महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक कार्यकारणी जाहीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ संघटनेच्या ठाणे जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ यांची कार्यकारणी सभा नुकतीच म. हो. विद्यालय ठाणे येथे संपन्न झाली. ठाणे जिल्ह्यातील ठाणे, कल्याण डोंबिवली, भिवंडी निजामपूर, उल्हासनगर, नवी मुंबई या महानगरपालिका तसेच सर्व तालुक्यांमधील बहुसंख्य शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

कल्याण तालुका अध्यक्षपदी



मितेश जैन यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ अध्यक्ष शरदचंद्र धारूरकर, मुंबई विभागीय सचिव अंकुर आहेर यांनी केली. या बैठकीमध्ये शालेय क्रीडा स्पर्धे विषयी, क्रीडा शिक्षकांच्या समस्या व क्रीडा शिक्षकांना ऑनलाईन अर्ज भरताना अनेक अडचणींना सामोरे जावे लाग लागते या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. मीतेश जैन हे अनेक विविध संघटनावर कार्यरत असून ॲथलेटिक्स या खेळामध्ये ते प्रशिक्षित आहेत.

काम करण्याची असलेली धडपड आणि नवीन काहीतरी करायचं या हेतूने नेहमीच कार्य करत असलेले मितेश जैन यांना दिलेल्या या जबाबदारीचा नक्कीच सार्थकी करतील अशी आशा व्यक्त होत आहे.

कल्याण तालुका क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघात अध्यक्ष पदी मितेश जैन, उपाध्यक्ष राज तिवारी, सचिव संजय पवार, सहसचिव गगन सपकाळ, कार्याध्यक्ष वृषाली मंत्रे, कोषाध्यक्ष संतोष घारे, महिला आघाडी प्रमुख सविता घरत, संघटक ऐश्वर्या मदने व सदस्य संतोष मुंडे यांची निवड करण्यात आली आहे.

# कोरावळे जिल्हा परिषद शाळेच्या आठवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, कोरावळे येथे नुकताच एक भावपूर्ण निरोप समारंभ पार पडला. या समारंभात, पदोन्नतीने शिक्षण विस्तार अधिकारी झालेले शाळेचे माजी मुख्याध्यापक दिगंबर पोटे यांचा पदोन्नती झाल्याबद्दल सपत्नीक गौरव करण्यात आला व निरोप देण्यात आला, तसेच इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. शाळेच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थांनी भावूक वातावरणात आपले मनोगत व्यक्त केले.



दिगंबर पोटे यांनी आपल्या कार्यकाळात शाळेला एक नवी दिशा दिली. त्यांनी शालेय प्रशासनात शिस्त आणि गुणवत्ता आणण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, कोरावळे जिल्हा परिषद शाळेने शैक्षणिक आणि सह-शैक्षणिक क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात शाळेला अनेक सन्मान मिळवून दिले, याचे श्रेय . पोटे सर यांच्या दूरदृष्टीला जाते, असे मत यावेळी शिक्षकांनी व्यक्त केले.

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात, वर्गशिक्षक कृष्णकांत मलिक यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे विशेष कौतुक केले. "या विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत शाळेला नवी ओळख मिळवून दिली अशाच प्रकारचे उज्ज्वल कार्य भविष्यात आपल्याकडून व्हावे," असे ते म्हणाले.

पदोन्नतीने शाळेत नव्याने कार्यरत मुख्याध्यापक . मंगलदास कंटे यांनी दिगंबर पोटे यांच्या कार्याचे कौतुक करताना, "त्यांनी शाळेसाठी दिलेले योगदान अमूल्य आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेने अनेक उच्चांक गाठले. त्यांची जागा भरून काढणे कठीण आहे, परंतु त्यांचा आदर्श समोर ठेवून आम्ही शाळेची प्रगती कायम ठेवू," असे सांगितले. शाळेतील इतर शिक्षक, सीमा सोनवणे, शोभा उबाळे, अनिल भोईर, प्रशांत माळी, प्रतीक्षा धुमाळ आणि वृषाली धुमाळ यांनीही पोटे यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांनी पोटे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा अनुभव समृद्ध करणारा होता, असे सांगितले.

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात शाळेतील आठवणींना उजाळा दिला आणि शिक्षकांचे आभार मानले. "या शाळेने आम्हाला केवळ शिक्षणच दिले नाही, तर जीवनातील अनेक महत्त्वाचे धडे शिकवले," असे विद्यार्थ्यांनी सांगितले.

दिगंबर पोटे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. "तुम्ही जीवनात यशस्वी व्हा आणि शाळेचे नाव उंचावत राहा," असे ते म्हणाले. त्यांनी शिक्षकांनाही शाळेची गुणवत्ता कायम राखण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी पोटे यांच्या कार्याची प्रशंसा केली आणि विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. हा निरोप समारंभ कोरावळे जिल्हा परिषद शाळेसाठी एक अविस्मरणीय क्षण ठरला.

# प्रोजेक्ट सक्षम अंतर्गत
# पालिका शाळेतील विद्यार्थ्यांना दिली आवश्यक संसाधने

**द वी फाउंडेशन, बीएमसी, डब्ल्यूएचओ आणि गिलबारको वीडर रूट यांचा उपक्रम**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : द वी फाउंडेशन, गिलबारको वीडर रूट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, जागतिक आरोग्य संघटना आणि बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) यांच्या संयुक्त विद्यमाने असलेला प्रकल्प सक्षमने शुक्रवारी वांद्रे कुर्ला संकुलातील रामकृष्ण परमहंस मार्ग शाळेत एक महत्त्वाचा टप्पा साजरा केला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आवश्यक आरोग्य आणि कल्याणकारी संसाधने देऊन त्यांना सक्षम करण्याच्या प्रकल्पाच्या सुरू असलेल्या यशावर प्रकाश टाकण्यात आला. भरत नगर आणि बीकेसीमधील पाच बीएमसी शाळांमधील २००० हून अधिक विद्यार्थ्यांना आरोग्य आणि पोषण कार्यशाळा आणि तपासण्यांचा यापूर्वीच लाभ मिळाला आहे, जे समग्र बाल विकासासाठी तयार करण्यात आले आहेत, ज्यात आरोग्य, पोषण,



**उद्याच्या तरुणांना निरोगी आणि शाश्वत भविष्यासह सक्षम करणे हा उपक्रमाचा उद्देश**

स्वच्छता आणि शिक्षणाचा समावेश आहे.भारतातील बालमृत्यू दरात खराब स्वच्छता आणि अपर्याप्त पोषण हे काही महत्त्वाचे घटक आहेत, विशेषतः प्रतिबंधात्मक रोगांमुळे, हे ओळखून द वी फाउंडेशन प्रोजेक्ट सक्षमच्या माध्यमातून टिकाऊ बदल घडवण्यासाठी तळागाळातील कौशल्याचा उपयोग करत आहे. ही महत्त्वाकांक्षी सीएसआर मोहीम आता एका नवीन टप्प्यात प्रवेश करत आहे, ज्यात १० हजार मुले, १० हजार पालक आणि ५०० शिक्षक यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याची मोठी बांधिलकी आहे. या कार्यक्रमात प्रोजेक्ट सक्षमचा बहुआयामी दृष्टिकोन दर्शविण्यात आला.

ज्यात मुलांना वैयक्तिक स्वच्छता आणि योग्य स्वच्छता तंत्रांसाठी सर्वोत्तम पद्धतींबद्दल शिक्षित करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. साबणांव्यतिरिक्त, महिला विद्यार्थ्यांना मासिक पाळीच्या स्वच्छतेबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी सॅनिटरी पॅड वितरित करण्यात आले. भाषेतील प्रावीण्य सुधारणे आणि विद्यार्थ्यांचा संवादातील आत्मविश्वास वाढवणे या उद्देशाने एक परस्परसंवादी प्रश्नमंजुषा स्पर्धा. जागतिक आरोग्य संघटनेच्या आरोग्य तज्ञांनी आरोग्य, पोषण आणि रोग प्रतिबंधावर एक माहितीपूर्ण सत्र आयोजित केले.

विद्यार्थ्यांना त्यांची सर्जनशीलता व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहित करणे, ही स्पर्धा आरोग्य, स्वच्छता आणि टिकाऊपणाच्या थीमभोवती फिरत होती. प्रश्नमंजुषा आणि चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना शैक्षणिक किट देऊन त्यांचा गौरव करण्यात आला, ज्यामुळे प्रेरणा आणि शैक्षणिक विकासाला चालना मिळाली.

# लष्करी जवान अशोक रगडे यांचा सेवानिवृत्त कार्यक्रम संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : शहापूर तालुक्यातील सेवानिवृत्त लष्करी जवान अशोक रगडे यांचा सेवापूर्ती सोहळा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

आपल्या सतरा वर्षे सेवेतील कार्यकाळ पूर्ण झाल्यामुळे मराठा लाईट इन्फंट्रीचे वीर जवान अशोक प्रमिला फुलचंद रगडे यांचा शहापूर शहरात सेवापूर्ती सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सदर, कार्यक्रमाची सुरुवात शिवतीर्थावरील महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार व अभिवादन करून भव्य मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. या मिरवणुकीवेळी अनेक ग्रामस्थ, मित्र मंडळी यांनी अशोक रगडे यांना औक्षण व स्वागत करून वीर




जवानाबद्दलचा आदर व्यक्त केला. तर कार्यक्रमास्थळी राष्ट्रगीत व राज्य गीताच्या माध्यमातून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यामध्ये आपल्या सेवेत असताना अनेक पराक्रमी मोहिमांमध्ये यशस्वीपणे भाग घेतल्याचे प्रसंग अशोक रगडे यांनी कथन केले.

या कार्यक्रम प्रंसगी शिवसेना नेते प्रकाश पाटील, माजी आमदार पांडुरंग बरोरा, कुणबी समाजोन्नती संघाचे अध्यक्ष किशोर कुडव, भाजप शहर अध्यक्ष विवेक नार्वेकर, माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष शिंदे,ओबीसी नेते प्रकाश भांगरथ, सेना दलातील कार्यरत व निवृत्त सुभेदार सैनिक, नगरसेवक आदी राजकीय, सामाजिक पदाधिकारी, शासकीय अधिकारी हे आदर व्यक्त व सत्कार करण्यासाठी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी युवा नेते मनोज पानसरे यांनी पुढाकार घेत परिश्रम हाती घेतले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमर राऊत यांनी तर कार्यक्रमाची संगीत मैफिली वैभव मंडलिक यांनी वाढवली होती.

# रायगड जिल्हा परिषद तळे मराठी शाळेच्या यशाची परंपरा कायम

**जवाहर नवोदय प्रवेश परीक्षेत सलग सहा वर्षे सोळा विद्यार्थी प्रवेश पात्र**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बोरघर : 18 जानेवारी 2025 रोजी घेण्यात जवाहर नवोदय प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून रा. जि. प.शाळा तळे मराठी ता.तळा शाळेने सलग सहाव्या वर्षी यश मिळवले असून या शाळेचे 3 विद्यार्थी प्रवेश पात्र झाले आहेत. श्रावणी प्रल्हाद दळवी ,रुद्र राजू थिटेकर, प्रज्वल विश्वास गपाट या



विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश मिळवले आहे.2019/20 ते 2024/25 या शैक्षणिक वर्षात सलग 6 वर्ष नवोदय परीक्षेत 16 मुलांनी यश मिळवले आहे. नवोदय प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना 6 वी ते 12 वी पर्यंत सी बी एस सी बोर्डाचे शिक्षण मोफत मिळते. तळे

**तळे मराठी शाळा नेहमीच स्पर्धा परीक्षा तयारी साठी ओळखली जाते**

मराठी शाळा नेहमीच स्पर्धा परीक्षा तयारी साठी ओळखली जाते.

या सर्व मुलांना त्यांचे मार्गदर्शक श्री सुनील बैकर सर आणि त्यांचे सहकारी सुप्रिया जामकर मॅडम मुख्याध्यापक व मितल वावेकर वर्षा माडी,उषा गुरव,गोकुळ निकम यांचे सहकार्य लाभले. केंद्रप्रमुख मुबिण वासकर सर यांनी नेहमी प्रेरणा दिली. गाशिअ तांबट मॅडम ,विस्तार अधिकारी दिपक ठाकूर सर व्य. स.अध्यक्ष भास्कर गोळे ,उपाध्यक्ष वेदिका गोरिवळे सर्व सदस्य आणि पालक व माजी विद्यार्थी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी ,शिक्षक व शाळेचे अभिनंदन केले आहे.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024